# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

**मंगळवार, दिनांक ३० जून, २०२६**

**(सकाळी १०-०० ते ११-४५ वाजता)**

**सन २०२६-२०२७ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा (दुसरा व शेवटचा दिवस)**
**खालील मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा होईल.**

१) मुख्यमंत्री

२) उप मुख्यमंत्री (नगरविकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम))

३) उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ)

४) महसूल मंत्री

५) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री

६) जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री

७) वैद्यकीय शिक्षण मंत्री

८) उच्च व तंत्र शिक्षण व संसदीय कार्य मंत्री

९) जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन मंत्री

१०) वने मंत्री

११) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री

१२) शालेय शिक्षण मंत्री

१३) उद्योग, मराठी भाषा मंत्री

१४) पणन, राजशिष्टाचार मंत्री

१५) पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री

१६) इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री

१७) आदिवासी विकास मंत्री

१८) पर्यटन, खनिकर्म, माजी सैनिक कल्याण मंत्री

१९) माहिती तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्य मंत्री

**२०)** कृषी मंत्री

**२१)** महिला व बालविकास मंत्री

**२२)** सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री

**२३)** ग्रामविकास व पंचायत राज मंत्री

**२४)** अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री

**२५)** वस्त्रोद्योग मंत्री

**२६)** सामाजिक न्याय मंत्री

**२७)** परिवहन मंत्री

**२८)** रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री

**२९)** मदत व पुनर्वसन मंत्री

**३०)** मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री

**३१)** कामगार मंत्री

**३२)** सहकार मंत्री

**३३)** सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री

## (दुपारी १२-०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

(१) **माहिती तंत्रज्ञान मंत्री** : "महाराष्ट्र माहिती व तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित, यांचे सन २०१६-२०१७ ते सन २०२१-२०२२ या वर्षांचे वार्षिक अहवाल" सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

(२) **महिला व बालविकास मंत्री** : "लाडकी बहिण योजनेसाठी अनेक जाचक अटी लादण्यात येणे" या विषयावरील ॲड. अनिल परब व इतर वि.प.स. यांनी म.वि.प. नियम १०१ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ६ वरील चर्चेच्या वेळी दिनांक ५ मार्च, २०२५

रोजी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**तीन : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना – (असल्यास)**

**चार : लक्षवेधी सूचना – (म.वि.प. नियम १०१ अन्वये) –**

**(सोमवार, दिनांक २९ जून, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना) - [अनुक्रमांक (१) ] –**

(१) **श्री. ओमप्रकाश *ऊर्फ* बच्चू कडू, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **ग्रामविकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील ग्रामपंचायतीमध्ये मागील अनेक वर्षापासून संगणक परिचालक खासगी कंपनीद्वारे कार्यरत असणे, संगणक परिचालक हे पद ग्रामपंचायत स्तरावरील अतिशय महत्त्वाचे पद असणे, मात्र सद्य:स्थितीत परिचालकांना मिळणारे मानधन हे इतके तुटपंजे आहे की त्यावर उदरनिर्वाह करणे त्यांच्यासाठी कठीण होणे, सदरहू गंभीर विषयावर दिनांक ३० ऑक्टोबर २०२५ रोजी मंत्री महोदयांच्या उपस्थितीत चर्चा होणे, त्यात संगणक परिचालकांची नियुक्ती कोणत्याही कंत्राटी खासगी कंपनीद्वारे न देता त्यांचे 'ग्रामपंचायत सहाय्यक' असे पदनाम करून त्यांना किमान २० हजार रुपये मानधन सुरु करण्यावर चर्चा होणे, या मागणीला वर्ष होऊनही शासनाने कार्यवाही न करणे, त्याच बरोबर ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी व पेन्शन लागू करण्याबरोबरच उत्पन्नाची मर्यादा वाढविण्यात येऊन अनुकंपा धोरणानुसार ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना वर्ग ३ व ४ पदावर भरती तसेच ३ वर्षांपासून बंद भरती प्रक्रिया सुरु करण्याच्या व यावलकर समितीच्या शिफारशीनुसार ग्रामपंचायत आकृतीबंध सुधारण्यात येण्यासंबंधीचे निवेदन दिनांक २० जून, २०२६ रोजी उपमुख्यमंत्री महोदयांना देण्यात येणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

(२) **श्री. अरुण लाड, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"सांगली जिल्ह्यातील २,२०० हून अधिक ट्रान्सफॉर्मर (रोहित्र) पैकी अनेक ठिकाणचे डीपी अत्यंत धोकादायक अवस्थेत असल्याची गंभीर बाब दिनांक १० जून, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, जिल्ह्यातील ग्रामीण भागात वीज वितरण व्यवस्थेचा कारभार अक्षरश: धोकादायक झाला असणे, जीर्ण वीज वाहिन्या (तारा) उघड्या व धोकादायक अवस्थेत असणे, डीपी, गंजलेले व झुकलेले खांब, झाडांच्या फांद्यांतून जाणाऱ्या, लटकणाऱ्या वाहिन्या आणि वारंवार तांत्रिक बिघाड यामुळे ग्राहक व शेतकऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होणे, जिल्ह्यात २०० हून अधिक गावांत २५ ते ३० वर्षांनंतर वीज वाहिन्या बदलणे आवश्यक असताना

अनेक भागांत आजही सन १९६२ ते १९७० या कालावधीत उभारलेल्या जुन्याच जीर्ण वाहिन्यांद्वारे वीजपुरवठा सुरू असणे, लटकणाऱ्या वाहिन्यांमुळे ऊस, द्राक्षबागा आणि इतर पिकांचे नुकसान होणे, अनेकदा शॉर्टसर्किटमुळे उभ्या पिकांना आग लागल्याच्या घटना घडणे, पिन इन्सुलेटर आणि इतर साहित्य वारंवार निकामी झाल्याने वीज खंडीत होणे, कमी दाबाने वीज, तांत्रिक बिघाड, खराब इन्सुलेटरमुळे खांबांमध्ये विद्युत प्रवाह उतरून वाढत्या अपघातांच्या घटना घडणे, ईश्वरपूर व विटा येथील ३०० हून अधिक डीपी दयनीय अवस्थेत असून बहुतांश डीपी बॉक्सला दारे नसणे, फ्युज उघडे असणे, महावितरणने मूलभूत सुविधांच्या देखभालीकडे गांभीर्याने लक्ष देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **सर्वश्री अभिजित वंजारी, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुधाकर अडबाले, धीरज लिंगाडे, सतेज *ऊर्फ* बंटी पाटील, जयंत आसगावकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"शासनाच्या विविध आस्थापनातील पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांची संख्या राज्यात जवळपास ३००० ते ३५०० असून सेवानिवृत्त पदवीधर अंशकालीन कर्मचारी यांची संख्या ५० पेक्षा अधिक असणे, शासन सेवेत पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांस नियुक्तीची वयोमर्यादा ४६ ते ५५ वर्षापर्यंत असल्यामुळे या कर्मचाऱ्यांच्या शासन सेवेचा कालावधी अत्यल्प असणे, वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार तसेच मा. उच्च न्यायालय, संभाजीनगर खंडपीठ यांच्या दिनांक २४ एप्रिल, २०२६ रोजीच्या आदेशानुसार राज्यातील पदवीधर अंशकालीन कर्मचारी यांच्या बाबतीत एक वेळ विशेष बाब म्हणून शासनाने धोरणात्मक निर्णय घेतल्यास राज्यातील सर्व पदवीधर अंशकालीन कर्मचारी यांची सामाजिक व आर्थिक परिस्थिती सुखकर करण्यासाठी राज्यातील विविध शासकीय आस्थापनेत अथवा कार्यालयात पदवीधर अंशकालीन म्हणून रुजू झालेले दिनांक व शासन दिनांक ग्राहय धरुन सर्व अनुज्ञेय असलेले लाभ पूर्वलक्षी प्रभावाने देण्याकरिता आंध्र प्रदेश शासनाच्या धर्तीवर 'एक विशेष बाब' म्हणून पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांचा अल्प शासकीय काळ विचारात घेवून सेवानिवृत्तीचे वय ५८ वरुन ६० करण्याबाबत तसेच सर्व पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम, १९८२ अन्वये जुनी पेंशनचा लाभ देण्याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(४) **श्री. राजहंस सिंह, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास)** लक्ष वेधतील :-

"बृहन्मुंबईला ४६६५ दशलक्ष लिटर पाण्याची मागणी अपेक्षित असताना सध्या सात प्रमुख धरणांमधून सुमारे ४१०० दशलक्ष लिटर पाणीपुरवठा होत असणे,

मुंबईला सुमारे ५६५ दशलक्ष लिटर पाण्याची कमतरता भासत असणे, मुंबईची वाढणारी लोकसंख्या व उपलब्ध जलस्रोतांवरील वाढत्या ताणामुळे हा पाणीपुरवठा अपुरा पडत असणे, मुंबईला होत असलेल्या पाणीपुरवठा जलवाहिन्यांमध्ये पाण्याच्या गळती व्यतिरिक्त प्रशासनातील काही घटकांच्या संगनमताने अनधिकृत जलजोडण्या घेऊन पाण्याचा गैरवापर होत असणे, विशेषतः कुर्ला, मानखुर्द, गोवंडी, कलिना, साकीनाका, मालवणी परिसरातील वस्त्यांमध्ये अनेक अनधिकृत गॅरेजेसमध्ये वाहन धुण्याच्या व्यवसायासाठी अनधिकृत जलजोडण्यांच्या माध्यमातून पाण्याचा सर्रास वापर केला जात असणे, कुर्ला, साकीनाका आणि LBS रोड या परिसरातील २-३ मजली अनधिकृत हॉटेल्स, लॉजेस व व्यापारी गाळ्यांना देखील अनधिकृत जलजोडण्या पुरविल्याची बाब समोर येणे, दररोज लाखो लिटर पाण्याचा अपव्यय होत असून प्रामाणिकपणे कर व पाणीपट्टी भरणाऱ्या मुंबईकरांच्या हक्काच्या पाण्यावर अतिक्रमण होत असणे, त्यामुळे शासनाने व महानगरपालिका प्रशासनाने विशेष मोहीम राबवून अशा सर्व अनधिकृत जलजोडण्या तात्काळ खंडीत करण्याची गरज, दोषी अधिकारी व लाभार्थींवर कठोर दंडात्मक कारवाई करण्याची आवश्यकता, अनधिकृत गॅरेजेस, हॉटेल्स, लॉजेस आणि इतर व्यावसायिक आस्थापनांविरुद्ध संबंधित पोलीस ठाण्यांमध्ये FIR नोंदवून दंड आकारणी व अनधिकृत बांधकामांवर निष्कासनाची कार्यवाही करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(५) **श्री. सचिन अहिर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (गृहनिर्माण)** लक्ष वेधतील :-

"पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) महानगरपालिकेच्या हद्दीतील मिलिंदनगर, विठठलनगर, नेहरुनगर गोसावीवस्ती (कोथरुड) येथे बीएसयुपी आणि झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत मोठ्या प्रमाणात झालेला गैरव्यवहार, दिनांक १४ फेब्रुवारी, २०२३ रोजी सोनिग्रा इन्फोकॉनने चिंचवड येथे पुनर्वसनाचा प्रस्ताव झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (SRA) कडे सादर करणे, त्यास झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (SRA) ने दिलेली मंजूरी, चिंचवड येथील जागेची संमती पत्रांचा वापर करुन त्याच ठिकाणी नियमबाह्य परवानगी मागणे, मिलिंदनगरमध्ये महानगरपालिकेच्या नोंदीनुसार ११५३ झोपड्या असतांना विकासकाने १२३१ झोपड्या बोगस दाखवून मंजूरी घेणे, केंद्रनिधी अंतर्गत आधीच ५६० झोपडयांना घरे दिलेली असल्याने उर्वरित ५९३ साठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (SRA) योजना राबविणे गरजेचे असणे, परंतु विकासकाने १२३१ चा प्रस्ताव मंजूर करुन ९ लाख चौ.फू. अतिरिक्त TDR गैरव्यवहार, विकासकाने ६२८ अतिरिक्त घरे बोगस दाखवून नियमबाह्य प्रस्तावाला विना हरकत मंजुरी घेऊन कायद्याचे उल्लंघन करणे, याच भागातील विठ्ठलनगर, नेहरुनगर व गोसावीवस्ती (कोथरुड) येथे बीएसयुपी योजना राबविणे, प्रकल्पातील अपूर्णावस्थेत राहिलेली कामे पूर्ण करण्यासाठी "साई मिरॅकल

विकासक" यांनी स.नं. १०० साठी माहे जानेवारी, २०२१ मध्ये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (SRA) कडे प्रस्ताव दाखल करणे, विकासकाने १,४९५ झोपडीधारक असल्याचे दाखवून ७४ झोपडीधारकांची संमती असल्याचा खोटा दावा करुन माहे डिसेंबर, २०२१ मध्ये घेतलेली मंजूरी, बीएसयुपी योजनेअंतर्गत १,२४० घरे देण्यात आलेली असतांना त्यांना पुन्हा नवीन झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (SRA) योजनेमध्ये बेकायदेशीररित्या समाविष्ट करणे, झोपडीधारकांनी एकदा लाभ घेतलेला असताना पुन्हा लाभ घेऊन शासनाची फसवणूक केलेली असणे, गोसावी वस्ती मध्ये ९,२३६ बोगस झोपड्या दाखवून ९ हजार कोटीहून अधिकचा केलेला गैरव्यवहार, संपूर्ण गैरव्यवहार तत्कालीन एसआरएचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कार्यकाळात होणे, उक्त योजनेअंतर्गत झालेल्या गैरव्यवहाराप्रकरणी सखोल चौकशीची गरज, यास जबाबदार व संगनमत असलेल्या महानगरपालिकांच्या संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, विकासकाने यापूर्वीही पुण्यातील जनता वसाहतमध्ये TDR गैरव्यवहाराचा प्रयत्न, तसेच ६२८ अतिरिक्त बोगस दाखविण्यात आलेल्या घरांच्या कागदपत्रांची तपासणी करुन यास जबाबदार असलेल्या महानगरपालिकेतील संबंधित अधिकारी यांच्याविरुध्द शासनाने करावयाची कठोर कारवाई व शासनाची याबाबतची प्रतिकिया."

(६) **सर्वश्री सदाशिव खोत, सुनिल शिंदे, श्रीमती उमा खापरे, श्री. प्रसाद लाड, ॲड. निरंजन डावखरे,डॉ. परिणय फुके, सर्वश्री प्रविण दरेकर, ज्ञानेश्वर म्हात्रे, रविंद्र फाटक, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **कृषी मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"यंदाच्या खरीप हंगामात राज्यासमोर कमी पावसाचे संकट निर्माण होण्याची शक्यता असून जागतिक परिस्थितीमुळे रासायनिक खतांच्या उपलब्धतेवरही परिणाम होण्याची शक्यता असणे, मा.मुख्यमंत्र्यांनी खरीप हंगाम २०२६ च्या तयारीसंदर्भात घेतलेल्या आढावा बैठकीत पीक कर्ज वितरण, बियाणे व खत उपलब्धता, कृषी क्षेत्रातील डिजिटल उपक्रम तसेच इंधन पुरवठ्याबाबत प्रशासनाला आवश्यक निर्देश दिलेले असणे, हवामान विभागाने अल-निनोच्या प्रभावामुळे राज्यात दीर्घकालीन सरासरीच्या केवळ ८८ टक्के पाऊस पडण्याचा अंदाज व्यक्त केला असून, पश्चिम विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्र या भागांमध्ये पर्जन्यमानातील तुटवडा अधिक गंभीर राहण्याची शक्यता असणे, संपूर्ण राज्यातील पेरण्या खोळंबल्या असून उशिरा पेरणी केल्यास रब्बी हंगामावर विपरीत परिणाम होऊन पिकांवर रोग-किडीचा प्रादुर्भाव दिसून उत्पादनात खर्च वाढणे, उत्पादन घटल्याने पावसाअभावी शेतकऱ्यांवर 'दुबार पेरणी'चे मोठे आर्थिक संकट येणे, यंदा विक्रेत्यांनी क्रेडिटवर माल न देता ॲडव्हान्स पैसे घेऊन माल खरेदी करणे, त्यामुळे

विक्रेत्यांनी लाखो रुपये गुंतवून साठा करून ठेवणे, बाजारात खते आणि बियाण्यांना मागणी नसल्याने संपूर्ण भांडवल अडकून पडून किरकोळ विक्रेते आणि शेतकरी अडचणीत सापडणे, ग्रामीण भागात मशागतीच्या कामांसाठी पेट्रोल व डिझेल टंचाई जाणवत असल्याच्या तक्रारी प्राप्त होत असणे, या पार्श्वभूमीवर शासनाने शेतकऱ्यांना वेळेत व पुरेशा प्रमाणात पीक कर्ज उपलब्ध करून देणे, प्रमाणित बियाणे व खतांचा पुरेसा साठा उपलब्ध ठेवणे, इंधन साठेबाजी विरोधात कठोर कारवाई करणे, ग्रामीण भागातील विहिरी, बोअरवेल आणि पारंपरिक जलस्त्रोतांची पाणीपातळी कमालीची खालावली गेल्याने त्याचा थेट फटका पशुधनाला बसून हिरवा चारा शेतकऱ्यांना बाहेरून महागड्या दराने खरेदी करावा लागून आर्थिक भार सहन करावा लागणे, आगामी काळात दूध उत्पादनात मोठी घट होण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जाणे, 'अल निनो'च्या प्रभावामुळे राज्यात पुन्हा एकदा भीषण आर्थिक समस्यांच्या मालिकेत तसेच आपत्कालीन परिस्थितीत शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याची आवश्यकता असल्याने शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**पाच : म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास)**

**सहा : शासकीय विधेयके —**

**(क) विधानसभेने संमत केल्यास — विधेयक विचारात घेणे :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३९ — महाराष्ट्र (द्वितीय पुरवणी) विनियोजन विधेयक, २०२६"

**(ख) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे — विचार, खंडशः विचार व संमत करणे.**

**(१)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४ - महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग (सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री अंबादास दानवे, अभिजित वंजारी, सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४ - महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग (सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

---------------------------------------------------------------------

**(२)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३८ - महाराष्ट्र नगरपालिका कायदे (सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. सतेज *ऊर्फ* बंटी पाटील, ॲड. अनिल परब, सर्वश्री अंबादास दानवे, अभिजित वंजारी, सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३८ - महाराष्ट्र नगरपालिका कायदे (सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

**सात : म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

**(क) श्री. सतेज *ऊर्फ* बंटी पाटील,** ॲड. अनिल परब, सर्वश्री अशोक *ऊर्फ* भाई जगताप, सुनिल शिंदे, एकनाथराव खडसे, अंबादास दानवे, अभिजित वंजारी, सचिन अहिर, अरुण लाड, सुधाकर अडबाले, मिलिंद नार्वेकर, जयंत आसगावकर, जगन्नाथ अभ्यंकर, धीरज लिंगाडे, **वि.प.स यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव — (मंत्र्यांचे उत्तर)**

"मराठी माध्यमांच्या शाळा बंद होणे, शिक्षक मंजूरीचे निकष आरटीई कायद्या विरुध्द असणे, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परिक्षेतील अनागोंदी कारभार, मुंबई महानगरपालिकेने नालेसफाई केली नसल्यामुळे पहिल्याच पावसात जनता बेजार होणे, किरकोळ महागाईचा दर माहे मे, २०२६ मध्ये ३.९३ टक्के असून त्यामध्ये वाढ होणे, अन्न धान्य महागाईचा दर ४.७८ टक्क्यापर्यंत वाढल्याचा फटका कष्टकरी व अल्प उत्पन्न गटातील लोकांना बसणे, इंधन दर वाढीमुळे सर्वसामान्य नागरिक त्रस्त होणे, महागाईचा सर्वात जास्त फटका सर्वसामान्य जनता व मध्यमवर्ग नोकरदार यांना बसणे, ग्रामीण भागातील रस्त्यांचा दर्जा निकृष्ट असताना रस्त्यात मोठ मोठे खड्डे पडणे, निकृष्ट डांबरीकरणामुळे अपघाताचे प्रमाण वाढणे, रुग्णांना रुग्णालयापर्यंत नेणे कठीण होणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(ख) श्री. प्रविण दरेकर,** डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री विक्रम काळे, प्रसाद लाड, हेमंत पाटील, शिवाजीराव गर्जे, ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री ओमप्रकाश *ऊर्फ* बच्चू कडू, पंकज भुजबळ, राजहंस सिंह, डॉ. मनिषा कायंदे, श्री. इद्रिस नायकवडी, डॉ. परिणय फुके, श्रीमती भावना गवळी, श्री. संजय खोडके, श्रीमती चित्रा वाघ, सर्वश्री कृपाल तुमाने, अनिकेत तटकरे, अमित गोरखे, किशोर दराडे, झीशान सिद्दिकी, योगेश टिळेकर, चंद्रकांत रघुवंशी, विक्रम काकडे, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री रविंद्र फाटक, वसंत खंडेलवाल, दुष्यंत चतुर्वेदी, सदाशिव खोत, किरण सरनाईक, विक्रांत पाटील, गोकुळ गीते, अमरिशभाई पटेल, ज्ञानेश्वर म्हात्रे, सुनील कर्जतकर, श्रीमती माधवी नाईक, सर्वश्री प्रमोद जठार, विवेक कोल्हे, अरुण लखानी, डॉ. प्रज्ञा सातव, श्री. धर्मगुरू बाबूसिंग राठोड, डॉ. राजीव पोतदार,

सर्वश्री संजय भेंडे, प्राजक्त तनपूरे, प्रविण पोटे-पाटील, राजेंद्र राऊत, अविनाश ब्राम्हणकर, नंदकिशोर महाजन, धैर्यशील कदम, अमरनाथ राजूरकर, बसवराज पाटील, सुहास शिरसाठ, **वि.प.स यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव –**

"मागील दोन वर्षांच्या काळात मुंबईसह एमएमआरडीए व पीएमआरडीए भागात पर्यावरणपूरक व गतीमान दळणवळण आणि गृहनिर्माण, झोपडपट्टी निर्मूलन हे मुद्दे केंद्रबिंदू मानून व स्मार्टसिटीचे लक्ष डोळयासमोर ठेऊन स्थानिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी नियोजनात्मक व कालबध्द कामे हाती घेण्यात येणे, ही शहरे खड्डेमुक्त करण्याकरिता रस्त्यांचे काँक्रीटीकरण करण्याचा निर्णय घेण्यात येणे, मुंबईतील भेंडीबाजार, धारावी सारख्या गजबजलेल्या भागांचे पुनर्वसन करण्याकरिता एसबीयुटी सारखे गृहनिर्माण प्रकल्प नागरी पुनरुत्थान घडविणारे होणार असणे, स्वयं पुनर्विकासाच्या माध्यमातून गृहनिर्माण प्रकल्प अधिक गतीमान करण्यासाठी मुंबई जिल्हा बँकेकडून देण्यात येणाऱ्या कर्ज मर्यादेत वाढ करण्यात आली असणे, एमएमआरडीए क्षेत्रात सहकारी गृहनिर्माण संस्थाच्या पुनर्विकासासाठी मुंबई जिल्हा बँकेला नोडल एजन्सी म्हणून मान्यता देण्यात येणे, बीडीडी चाळीच्या पुनर्विकास प्रकल्पांना प्रोत्साहन मिळण्यासाठी पुनर्विकास करारनामा करणे, मुंबईतील पोलीस कर्मचाऱ्यांना पुरेशी निवासस्थाने उपलब्ध करुन देण्यासाठी दीर्घकालीन, मध्यमकालीन व तात्काळ अशा तीन टप्प्यांवर पुनर्विकास करण्याचा निर्णय घेण्यात येणे, पुण्यातील सहकारी गृहनिर्माण सोसायट्या व गृहनिर्माण मंडळाच्या वसाहतींचे स्ट्रक्चरल ऑडीट करुन पुनर्विकास करण्याची आवश्यकता, पीएमआरडीएच्या माध्यमातून पुणे शहरातील डीपी प्लॅन व रिंग रोड नव्याने तयार करण्याची आवश्यकता, मुंबईकरांना तात्काळ आरोग्य सुविधा मिळण्याकरिता मुंबईत मोबाईल मेडिकल युनिट सुरु करण्यात आले असणे, मुंबई, एमएमआरडीए व पीएमआरडीए, नागपूर, छत्रपती संभाजीनगर इत्यादी मोठया शहरांचा मेगापॉलिस मेटाव्हर्स प्रकल्पाच्या मदतीने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन अधिक गतीमान विकास करण्याचा व ही शहरे झोपडीमुक्त करण्याच्या दृष्टीने शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना."

**आठ : अर्धा-तास चर्चा म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी)**

(१) **श्रीमती उमा खापरे, सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"**महाज्योती संस्थेला शासनाकडून १५०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आल्याबाबत**" या विषयावरील श्रीमती उमा खापरे व इतर वि.प.स. यांचा दिनांक २५ मार्च, २०२६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्र. २१ मधील अतारांकित प्रश्न क्रमांक ५४२१ ला दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील."

(२) **सर्वश्री सतेज *ऊर्फ* बंटी पाटील, अभिजित वंजारी, अशोक *ऊर्फ* भाई जगताप, वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"**राज्यातील शासकीय वैद्यकीय संस्थांमध्ये पोर्टेबल एम.आर.आय. प्रणालीची अंमलबजावणी करणेबाबत**" या विषयावरील श्री. श्रीकांत भारतीय, वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ७१५० ला दिनांक २६ फेब्रुवारी, २०२६ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : २९ जून, २०२६.

**डॉ. विलास आठवले,**
सचिव-३ ,
महाराष्ट्र विधानपरिषद.